श्री गणेशाचे तात्काळ प्रभावी फळ देणारे मंत्र

गणपतीचे बीजमंत्र गं आहे.

ॐ गं गाणपत्ये नमः या मंत्राचा जप केल्याने सर्व मनोकामना पूर्ण होतात.

षडाक्षरी मंत्र आर्थिक प्रगती आणि समृद्धी देणारा- ॐ वक्रतुंडाय हुम्.

उच्छिष्ट गणपतीचे मंत्र - ॐ हस्ती पिशाच्ची लिखे स्वाहा.

आळस, नैराश्य, कलह,विघ्न दूर करण्यासाठी- गं क्षिप्रप्रसादनाय नमः

सर्व विघ्न दूर करून संपत्ती आणि आत्मविश्वासाच्या प्राप्तीसाठी-ॐ गं नमः

उपजीविका प्राप्ती आणि आर्थिक वाढीसाठी लक्ष्मीविनायक मंत्र

- ॐ श्री गं सौभ्याय गाणपत्ये वर वरद सर्वजनं मे वशमानय स्वाहा.

विवाहात येणारा अडथळ्यांना दूर करणाऱ्यांना त्रैलोक्य मोहन गणेश मंत्र- ॐ वक्रतुण्डैक दंष्ट्राय क्लीं ह्रीं श्री गं गणपते वर वरद सर्वजनं मे वशमानय स्वाहा.

या मंत्राच्या व्यतिरिक्त गणपती अथर्वशीर्ष, संकटनाशन गणेश स्तोत्र, गणेशकवच, संतानं गणपती स्तोत्र, ऋणहर्ता गणपती स्तोत्र, मयूरेश स्तोत्र, गणेश चालीसाचे पठण केल्याने श्री गणेशाचे आशीर्वाद प्राप्त होतात.

सुख शांती समाधान

घरात येणाऱ्या चिमण्या, पशुपशी आलेले चांगले!

ज्या घरात आपण राहतो तेथे चिमण्या, पशुपक्षी यायलाच पाहिजेत आपण ज्या वास्तूत राहतो तेथे आपला उत्कर्ष व्हायलाच पाहिजे. वास्तू पवित्र व शुद्ध आहे की नाही हे कळायला हे उत्तम साधन आहे.

पितृपक्षात हे लक्षात ठेवा...

अनंत चतुर्दशी झाल्यानंतर पितृपक्षाचा प्रारंभ होतो. २० सप्टेंबरपासून पितृपक्ष सुरू होत असून ६ ऑक्टोबर रोजी समाप्त होतो. हा पितृपंधरवडा म्हणजेच पूर्वजांचे आशीर्वाद प्राप्त करण्याचा काळ मानला जातो. या दरम्यान आपल्या पुर्वजांचे स्मरण करावे, त्यांच्यासाठी पूजा, तर्पण करावे. यामुळे आपले पुर्वज आनंदी होतात. त्यांची कृपा आपल्यावर नेहमी राहते. तसेच या पंधरवड्यात काय करावे आणि काय करू नये, हे आपण खाली दिले आहे.

पितृपक्षात हे करू नये

- ☒ संपूर्ण पितृपक्षात मांसाहार, मदिरापान कधीही करू नये.
- ☒ धार्मिक कार्य करू नयेत.
- ☒ कोणाकडून उधार पैसे घेऊन कोणते कार्य करू नये.
- ☒ नवे घर, जमीन, वाहन खरेदी करू नये. मात्र, त्याबाबतची बोलणी, सौदा पक्का करणे, पूर्वतयारी आदी सर्व गोष्टी करू शकता.
- ☒ जुन्या घराची डागडुजी करण्याचे काम या काळात करू नये.
- ☒ फारच आवश्यक नसेल तर या काळात कपडे, दागिने आदी वस्तूही खरेदी करण्याचे लांबणीवर टाकावे.
- ☒ घरातील कोणताही भाग अंधारात राहू नये, याची काळजी घ्यावी.
- ☒ कोणत्याही स्थितीत खोटे, फसवणुकीचे कार्य करू नये. खरे तर वर्षभरासाठीच हा नियम पाळायला हवा.
- ☒ आपले कुळ, खानदानाची मर्यादा ओलांडून कोणतेही काम करू नये.
- ☒ तुम्ही स्वतः श्राद्ध करणारे नसाल श्राद्धाचे नियम पाळावेत.

पितृपक्षाच्या हे करा -

- ☑ श्राद्ध करणाऱ्याने संपूर्ण पितृपक्षात पितरांना उद्देशून तर्पण अवश्य करावे. यात जल, तीळ, कुश, पुष्पाचा वापर करावा.
- ☑ पितृ-श्राद्ध करण्याच्या दिवशी आपल्या सामर्थ्यानुसार, ब्राह्मणांना बोलावून तर्पण, पिंडदान, भोजन प्रदान केल्यानंतर दक्षिणा द्यावी.
- ☑ दैनंदिन पूजा अवश्य करावी.
- ☑ ब्रह्मचर्याचे पालन करून श्रद्धेने नियमित तर्पण करावे.
- ☑ सात्विक भोजन करावे. लसून, कांदा यांचा वापर अजिबात करू नये.
- ☑ संपूर्ण पितृपक्षात आपल्या पूर्वजांच्या चांगल्या कामाचे कौतुक करावे. मोठ्यांचा सन्मान करावा व गुरुजनांची पूजा करावी.
- ☑ दररोज आपल्या सामर्थ्यानुसार दुसऱ्याची मदत अवश्य करावी.
- ☑ मुंग्यांसाठी साखर योग्य जागी ठेवावीत.
- ☑ घराच्या छतावर किंवा स्वच्छ भांड्यात पाणी, अन्न व गोड वस्तू अवश्य ठेवाव्यात.
- ☑ घरी कुत्र्याला दुपारी पोळी, भाकरी जरूर द्यावी.

हंसाची मूर्ती घरात ठेवा

घरात 'दो हंसो का जोडा' म्हणजे दोन हंसांची जोडी ठेवावी. त्यामुळे संपत्ती आणि धनधान्यात भरभराट होण्याची शक्यता वाढेल आणि घरात नेहमीच शांतता राहील. दोन हंसऐवजी आपण दोन बदक किंवा दोन करकोचे यांच्या जोडीचीदेखील प्रतिमा ठेवू शकता. यामुळे वैवाहिक जीवनात सुसंवाद राखला जातो.

नागबळी

हा विधी आपल्याकडून या जन्मी किंवा मागील जन्मी तसेच या पिढीत किंवा मागील पिढीत नागहत्या घडली असेल तर त्या दोषाच्या परिहारासाठी करतात.

तसेच कुटुंबात वंशपरंपरागत चालत आलेल्या स्थावर जंगम मालमत्तेच्या बाबतीत नागसमंधाचा दोष असेल तर त्याच्या परिहारार्थही हा विधी करतात. या विधीमध्ये नागप्रतिमेचे आवाहन व पूजा, पिठाच्या नागाचे मंत्राग्नीने दहन व त्यास उद्देशून पिंडदानादी श्राद्धे करून त्यास गती प्राप्त करून दिली जाते. नारायणबलीप्रमाणे हा विधी घरी न करता नद्यादी संगम, समुद्र किंवा तीर्थस्थानी करतात.

रामरक्षा व मारुतीस्तोत्र वाचा...

झोपेतून ओरडत उठणे, झोपेत दात खाणे, विचित्र आवाज करणे, झोपेत चालत जाणे हा जन्मनक्षत्राचा परिणाम आहे. आश्लेषा नक्षत्रावर जन्मलेल्या व्यक्तींत हे दोष आढळतात. हा दोष निवारण्याकरिता रामरक्षा व मारुतीस्तोत्र पठण हा अत्यंत प्रभावी उपाय आहे.

थंड पाण्याने स्नान केव्हा महत्त्वाचे

घरात कोणाचा मृत्यू/जन्म झाल्यास, संक्रांतीच्या दिवशी, श्राद्धाच्या दिवशी, तिथीप्रमाणे वाढदिवशी व अस्पर्श स्पर्श झाल्यास तसेच चंद्र-सूर्यय ग्रहणात त्या दिवशी (व्याधीग्रस्त व्यक्ती सोडून) उष्ण पाण्याने स्नान न करता थंड पाण्याने स्नान करावे.

घरात नवचंडी याग करा

ज्यांची आर्थिक स्थिती उत्तम आहे त्यांनी आपल्या घरात दरवर्षी नवचंडी याग कारावा. त्याने वास्तुत शुभ लहरी निर्माण होतात व सकारात्मकता वाढते. घरात सुखसमृद्धी नांदते. देवीची कृपा सदैव आपल्यावर राहते. घरात देवीचा वास राहतो.

सोमवारी रंगकर्मींचे राज्यभर सर्व पितृस्मृती महाआंदोलन

■ मुंबई

देशात कोरोना महामारी सुरु झाल्यापासून रंगकर्मींचा रोजगार हिरावला गेला आहे. कोरोनामुळे बंद झालेले काम पुन्हा सुरु व्हावे यासाठी रंगकर्मींनी अनेकदा आंदोलने केली. अखेर रंगकर्मींनी ९ ऑगस्ट रोजी महाराष्ट्रभर केलेल्या आंदोलनाची दखल घेत सांस्कृतिक मंत्र्यांनी त्यांच्या मागण्यांना तत्वतः मान्यता दिली. मात्र त्या संबंधीचा लेखी, सरकारी आदेश अद्याप काढला गेलेला नाही. सर्व क्षेत्र टप्याटप्याने कार्यरत करण्यात आली. परंतु सांस्कृतिक क्षेत्राकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे. या विरोधात सोमवार, २७ सप्टेंबर २०२१ रोजी महाराष्ट्रातील सर्व रंगकर्मींनी आपापल्या जिल्ह्यात 'रंगकर्मी सर्व पितृस्मृती महाआंदोलन' करण्याचे ठरविले आहे, अशी माहिती रंगकर्मी आंदोलन महाराष्ट्रतर्फे देण्यात आली आहे. रंगकर्मींच्या मागण्यांसाठी ९ ऑगस्ट २०२१ क्रांतीदिनी संपुर्ण महाराष्ट्रात आपण 'जागर रंगकर्मी'चा हे आंदोलन करण्यात आले होते. या आंदोलनाची दखल घेत सांस्कृतिक मंत्र्यांनी आपल्याला भेटीला बोलावले. आपल्या मागण्यांना तत्वतः मान्यता दिली. पण अद्याप त्या संबंधीचा लेखी, सरकारी आदेश काढला नाही. राज्यातील रंगकर्मींनी ३० ऑगस्ट २०२१ रोजी नाट्यगृह आणि चित्रपटगृह सरकारने सुरु करावी यासाठी आपले दैवत असलेल्या 'नटराजाची महाआरती' हे आंदोलन केले. त्याची दखल घेऊन नाट्यगृह ५ नोव्हेंबरपासून चालू होतील अशी घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली. पण मुख्यमंत्र्यांचा हा निर्णय रंगकर्मींना मान्य नाही. सांस्कृतिक खाते आम्हां रंगकर्मींसाठी काहीही करीत नाही अशी ठाम समजूत महाराष्ट्रातील सर्व रंगकर्मींची झाली आहे आणि यामुळेच रंगकर्मींची बाजू सरकारकडे न मांडणारे, रंगकर्मींच्या कामी न येणारे सांस्कृतिक खाते तात्काळ बंद करावे ही मागणी जोर धरु लागली आहे. सगळी क्षेत्र टप्याटप्याने कार्यरत करण्यात आली परंतु सांस्कृतिक क्षेत्राकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे. रंगकर्मींच्या काही कलांना सादरीकरणासाठी तात्काळ परवानगी देऊन टप्याटप्याने इतर कलांनाही संमती देता येईल हा साधा विचार राज्यकर्त्यांच्या ध्यानीमनी नाही आणि तसा अभ्यासही नाही. तो विचार आणि अभ्यास आमच्या ज्या पितरांचा होता त्या कलाप्रेमी पितरांच्या स्मृती जागविण्यासाठी २१ सप्टेंबरपासून सुरु होणार्या पितृपक्ष पंधरवड्यातील, सोमवार, २७ सप्टेंबर २०२१ रोजी महाराष्ट्रातील सर्व रंगकर्मींनी आपापल्या जिल्ह्यात 'रंगकर्मी सर्व पितृस्मृती महाआंदोलन' करण्याचे ठरविले आहे, अशी माहिती रंगकर्मी आंदोलन महाराष्ट्रतर्फे देण्यात आली.

महात्मा गांधी आणि बाबासाहेबांमुळे भारत घडला! रामदास आठवलेचे विधान

मुंबई- दलितांसाठी स्वतंत्र मतदारसंघ गोलमेज परिषदेत इंग्रजांनी मान्य केले होते. मात्र महात्मा गांधी यांचे प्राण वाचविण्यासाठी आणि समाजाच्या हितासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महात्मा गांधींसमवेत पुणे करार केला होता. त्यानुसार स्वतंत्र मतदारसंघाऐवजी दलितांना आरक्षण देण्याचे सर्वांनुमते मान्य होऊन आरक्षण संविधानात समाविष्ट करण्यात आले. तसेच जेव्हा भारताच्या संविधान निर्मितीची वेळ आली तेव्हा महात्मा गांधी यांनी संविधानाच्या मसुदा समितीच्या अध्यक्षपदासाठी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव सुचविले होते. भारताच्या स्वातंत्र्यासाठी महात्मा गांधी लढत होते तसेच भारताच्या सामाजिक स्वातंत्र्यासाठी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर लढत होते. दोन्ही महापुरुषांमुळे भारत घडला आहे. महात्मा गांधी आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर एकमेकांचा आदर करणारे एकमेकांवर विश्वास असणारे महापुरुष होते असे प्रतिपादन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केले आहे. उमरखेड येथे महात्मा गांधी आणि महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाचे लोकार्पण रामदास आठवले यांच्या हस्ते आज करण्यात आले. यावेळी माजी मंत्री मदन येरावर, उमरखेडचे नगराध्यक्ष नामदेव ससाणे, भाजप जिल्हा अध्यक्ष नितीन भुतडा, रिपाइंचे ज्येष्ठ नेते सुधाकर तायडे, मोहन भोयर, रिपाइं यवतमाळ जिल्हा अध्यक्ष महेंद्र मानकर आदी मान्यवर उपस्थित होते.

राज कुंद्राविरोधात मनी लाँड्रीग प्रकरणी ईडीकडून गुन्हा दाखल

मुंबई- पॉर्नोग्राफी प्रकरणामध्ये सापडलेला अभिनेत्री शिल्पा शेट्टीचा पती आणि उद्योजक राज कुंद्राच्या अडचणी वाढत चालल्या आहेत. राज कुंद्राविरोधात मनी लाँड्रींगचे पुरावे सापडल्याने ईडीने गुन्हा दाखल केला आहे. पॉर्नोग्राफी कंटेंटच्या विक्रीतून मिळवलेला निधी लंडनमधील एका बँक खात्यात ट्रान्सफर करण्यात आल्याचा आरोप राज कुंद्रावर करण्यात आला आहे. जवळपास दोन महिने राज कुंद्रा कोठडीत आहे. १९ जुलै २०२१ ला राजला अटक करण्यात आली होती. पोर्नोग्राफी प्रकरणात राजसह त्याच्या काही साथीदारांना अटक करण्यात आली होती. न्यायालयीन कोठडीत असलेल्या राज कुंद्राविरोधात मुंबई क्राईम ब्रांचने नुकतीच १५०० पानांची एक चार्जशीट दाखल केली आहे. तर या चार्जशीटमध्ये ४३ लोकांची साक्षही नोंदवण्यात आली आहे. त्यात अभिनेत्री शिल्पा शेट्टीचाही समावेश आहे. हॉटशॉट ॲब आणि बॉलिफेम यासंदर्भात आपल्याला काही माहिती नसल्याचे शिल्पाने जबाबात म्हटले आहे. कामात व्यस्त असल्याने पती राज कुंद्रा काय करतो. याबाबतची माहिती नसल्याचेही शिल्पाने जबाबात म्हटले आहे. आता ईडीने मनी लाँड्रींगचे पुरावे सापडल्याप्रकरणी राज कुंद्राविरोधात पीएमएलए अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

राहुल गांधींना काँग्रेसचा अध्यक्ष करा -शशी थरुर

■ नवी दिल्ली

काँग्रेसचे वरिष्ठ नेते आणि खासदार शशी थरुर यांनी पुन्हा एकदा पक्षाच्या नेतृत्वात बदल करण्याची मागणी केली. थरुर म्हणाले की, पक्षाला नवीन नेतृत्वाची गरज आहे. जर राहुल गांधींना काँग्रेसचा अध्यक्ष बनवायचे असेल तर हे लवकर व्हायला हवे. काँग्रेसला पुन्हा सत्तेत यायचे असेल तर नेतृत्व बदल करणे गरजेचे आहे. शनिवारी तिरुवअनंतपुरममध्ये पत्रकाराशी बोलताना थरुर म्हणाले की, सोनिया गांधी स्वतः हंगामी अध्यक्षपद सोडू इच्छित आहेत. त्यामुळे पक्षाला लवकरात लवकर पक्षाचा नवा नेता निश्चित करायला हवा. जर राहुल गांधी यांना काँग्रेसचं अध्यक्षपद सांभाळायचं असेल तर लवकरात लवकर त्यांच्याकडे ही जबाबदारी द्यायला हवी. जर काँग्रेसला परत सत्ता काबीज करायची असेल तर लवकरच पक्षाचं नेतृत्वबदल करुन निवडणुकांचा सामना करायला तयार रहावं लागेल. काँग्रेसच्या विविध शाखांची इच्छा आहे की, राहुल गांधींना पुन्हा एकदा पक्षाचा अध्यक्ष निवडायला हवे, असे थरुर म्हणाले. दरम्यान नुकतीच युवक काँग्रेसच्या वतीने राहुल गांधी यांनाच पक्षाचे अध्यक्ष करण्याची मागणी केली गेली आहे.

अदानीच्या मनमानीला वीज नियामक आयोगाकडून चाप! राजेश शर्मा

मुंबई-अदानीच्या वाढीव वीजदराचा बोजा महावितरणच्या ग्राहकांवर पडणार नाही असे निर्देश वीज नियामक मंडळाने देऊन वीज ग्राहकांना मोठा दिलासा आहे. कोळसा खरेदीचा अतिरिक्त भार वीज ग्राहकांच्या माथी मारला जात होता. याप्रकरणी महावितरणने अदानीविरोधात केलेल्या तक्रारीवर वीज नियामक आयोगाने हे निर्देश दिले असून अदानीच्या मनमानी कारभाराला ही सणसणीत चपराक आहे, वीज नियामक मंडळाच्या या निर्णयाचे काँग्रेस पक्ष स्वागत करत असल्याचे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस राजेश शर्मा यांनी म्हटले आहे.

यासंदर्भात राजेश शर्मा म्हणाले की, महावितरणने अदानी वीज कंपनीविरोधातील ही लढाई जिंकून राज्यातील वीज ग्राहकांचे हित जोपण्याचे काम केले आहे. तिरोडा येथील औष्णिक विद्युत प्रकल्पासाठी अदानीने जवळच्या विझाग (विशाखापट्टणम) मधून कोळसा खरेदी करण्याऐवजी दहेज या दूरच्या बंदरातून कोळसा खरेदी केला. दहेजमधून कोळसा खरेदी केल्याने दहेज ते तिरोडा या वाहतुकीचा खर्च ५०० रुपये प्रति मेट्रीक टन वाढतो, याचा भूर्दड महावितरणच्या ग्राहकांना पडत होता. याविरोधात महावितरणने दाद मागितली होती. दहेज बंदर हे तिरोडासाठी जवळचे असल्याचे वीज नियामक मंडळाने मान्य केल्याचा अदानीचा दावाही वीज नियामक मंडळाने फेटाळून लावला. या निकालामुळे वीज ग्राहकांची अतिरिक्त वीजबिलातून सुटका करुन महावितरणने ग्राहकांचे हित जोपासले हे स्वागतार्ह असल्याचे शर्मा म्हणाले.

अदानी पॉवर कंपनीच्या नफेखोरीला आणखी एक झटका बसला आहे. अदानी मुंद्रा कंपनीविरोधातील गुजरात ऊर्जा निगमची याचिका सुप्रीम कोर्टाने दाखल करुन घेतल्याने अदानीचे नफेखोरीचे मनसुबे उधळले असून अदानी पॉवरला हा आणखी मोठा दणका असल्याचे, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस राजेश शर्मा यांनी म्हटले आहे. यासंदर्भात राजेश शर्मा म्हणाले की, गुजरात उर्जा विकास निगम व अदानीमुंद्रा यांच्यातील करारासंदर्भात दाखल करण्यात आलेल्या गुजरात उर्जा विकास निगमची क्युरेटीव्ह पीटीशन सुप्रीम कोर्टाने दाखल करुन घेतल्याने गुजरात ऊर्जा निगमशी केलेल्या वीज खरेदी करारातून अंग काढून घेण्याच्या अदानीच्या भूमिकेला मोठा धक्का बसला आहे. गुजरात मिनरल डेव्हलपमेंट कार्पोरेशनच्या नैनी ब्लॉक मधून वीज निर्मितीसाठी कोळसा मिळत नसल्याचे कारण देत अदानीमुंद्राने गुजरात ऊर्जा निगमशी केलेल्या वीज खरेदी करारातून बाहेर पडण्यासाठी जुलै २०१९ रोजी जस्टिस मिश्रा यांच्या खंडपीठासमोर दाद मागितली होती आणि अदानी मुंद्राची मागणी कोर्टानेही मान्य केली होती.

वार्षिक सर्वसाधारण सभा नोटीस

शिवाई नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, मुंबई

कार्यालय : १११, सौरभ बिल्डींग, मोदी इस्टेट, चिरागनगर पोलीस स्टेशनसमोर, एल.बी.एस. मार्ग, घाटकोपर (प), मुंबई - ४०००८६ या संस्थेच्या सभासदांची ३८वी वार्षिक सर्वसाधारण सभा **बुधवार दिनांक २९/०९/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता संस्थेचे अध्यक्ष श्री. मोहन गेणू गारगोटे** यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र शासनाच्या दिनांक ३० जुलै २०२१ च्या आदेशान्वये VC/OAVM (Other Audio Visual Means) द्वारे Online उपस्थित राहावे, ही नम्र विनंती. तरी सर्व सभासदांनी आपला संपुर्ण पत्ता, व्हॉटस्अप मोबाईल क्रमांक व ई-मेल पत्ता संस्थेच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत अथवा संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती प्राजक्ता जयसिंग काटकर यांचा मो.क्र. ९९८७९८२६३१ वर दिनांक २७/०९/२०२१ पर्यंत पाठविण्यात यावा. आपल्या व्हॉटसअप मोबाईल क्रमांक व ई-मेल पत्त्यावर वार्षिक सभेस हजर राहणे करिता २ दिवस अगोदर लिंक पाठविण्यात येईल. तसेच ज्या सभासदांना संस्थेच्या सन २०२०-२०२१ या सालच्या कामकाजाविषयी व आर्थिक पत्रकाविषयी माहिती हवी असेल तर त्यानी संस्थेत टेलीफोन क्र. ०२२-२५१३१०४८ व मो.क्र. ९९८७९८२६३१ या क्रमांकावर संपर्क साधुन घेण्यात यावी.

ठिकाण : घाटकोपर, मुंबई
दिनांक : १८/०९/२०२१

शिवाई नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, मुंबई
सही/-
मुख्य कार्यकारी अधिकारी
सौ. प्राजक्ता जयसिंग काटकर (९९८७९८२६३१)

फॉर्म ए

जाहीर उद्घोषणा

(भारतीय नादारी आणि दिवाळखोरीपणा मंडळ (कॉर्पोरेट व्यक्तींकरिता दिवाळखोरी तराव प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ६ अन्वये)

ग्रोहेल्दी इंडिया ॲग्रोटेक प्रायव्हेट लिमिटेडच्या धनकोंचे लक्ष वेधण्याकरिता संबंधित तपशील

१.	कॉर्पोरेट कर्जदाराचे नाव	ग्रोहेल्दी इंडिया ॲग्रोटेक प्रायव्हेट लिमिटेड
२.	कॉर्पोरेट कर्जदाराच्या स्थापनेचा दिनांक	२८.१०.२०१६
३.	प्राधिकरण ज्या अंतर्गत कॉर्पोरेट कर्जदाराची स्थापना/नोंदणीकरण झाले	आरओसी, मुंबई
४.	कॉर्पोरेट कर्जदाराचा कॉर्पोरेट ओळख क्रमांक / मर्यादित दायित्व ओळख क्रमांक	U01100MH2016PTC287201
५.	कॉर्पोरेट कर्जदाराच्या नोंदणीकृत कार्यालयाचा आणि प्रमुख कार्यालयाचा (जर असल्यास) पत्ता	**एमसीए नोंदीनुसार नोंदणीकृत कार्यालय:** ३० व ३१, ६ वा मजला, अंधेरी, मोतिशा सीएचएस लि., एस. व्ही. रोड, देवलाह्याय शेजारी, अंधेरी, मुंबई शहर, महा. ४०००५८, भारत.
६.	कॉर्पोरेट कर्जदाराच्या संदर्भात दिवाळखोरी सुरु होण्याचा दिनांक	**३० ऑगस्ट**, २०२१ (एनसीएलटी, मुंबई खंडपीठाद्वारे दि. ३०.०८.२०२१ रोजी आदेश पारित. सी.पी.क्र. ९०९/एमबी/२०२०. अंतरिम ठराव व्यवसायिकाद्वारे आदेश दि. १७ सप्टेंबर, २०२१ रोजी डाऊनलोड करण्यात आला)
७.	दिवाळखोरी ठराव प्रक्रिया परिसमाप्तीचा अंदाजित दिनांक	१५.०३.२०२१
८.	अंतरिम ठराव व्यावसायिक म्हणून काम पाहणाऱ्या दिवाळखोरी व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणीकरण क्रमांक	नावः संजय बद्रिलाल पुंगलिया नोंदणीकरण क्र. IBBI/IPA-001/IP-P00855/2017-18/11437
९.	मंडळाकडे नोंदणीकृत असल्यानुसार, अंतरिम ठराव व्यावसायिकाचा पत्ता आणि ईमेल	**श्री. संजय बद्रिलाल पुंगलिया** ५०१, आलिन कॉम्प्लेक्स, गुजरात विद्यापिठासमोर, आश्रम रोड, अहमदाबाद-३८००१४, ईमेल : capunglia@gmail.com
१०.	अंतरिम ठराव व्यावसायिकासह पत्रव्यवहाराकरिता वापरावयाचा पत्ता आणि ईमेल	५०१, आलिन कॉम्प्लेक्स, रेंभा कॉम्प्लेक्सजवळ गुजरात विद्यापीठासमोर, आश्रम रोड, अहमदाबाद -३८००१४. ईमेलः grohealthyagro@gmail.com
११.	दावे सादर करण्याचा अंतिम दिनांक	**३०.०९.२०२१** म्हणजेच आयआरपीद्वारे आदेश डाऊनलोड केल्याच्या दिनांक म्हणजेच १७.०९.२०२१ रोजी पासून १४ दिवस.
१२.	अंतरिम ठराव व्यावसायिकाद्वारे निश्चित केल्यानुसार, कलम २१ च्या उप-कलम (६अ) च्या खंड (ब) अन्वये कर्जदाराचे वर्ग, जर असल्यास.	सध्या लागू नाही.
१३.	वर्गामधील धनकोंचे प्राधिकृत प्रतिनिधी म्हणून काम करण्याकरिता ठरविण्यात आलेल्या दिवाळखोरी व्यावसायिकांची नावे (प्रत्येक वर्गाकरिता तीन नावे)	सध्या लागू नाही.
१४.	(अ) संबंधित अर्ज आणि (ब) अधिकृत प्रतिनिधींचा तपशील उपलब्ध असेल :	**वेब लिंक:** https://ibbi.gov.in/home/downloads **भौतिक पत्ता:** वरील प्रमाणे आयआरपी grohealthyagro@gmail.com **येथे ईमेल करावा.** **(ब) लागू नाही.**

याद्वारे सूचना देण्यात येते की, राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण यांनी **दिनांक ३०.०८.२०२१** रोजी **ग्रोहेल्दी इंडिया ॲग्रोटेक प्रायव्हेट लिमिटेड**ची कॉर्पोरेट दिवाळखोरी ठराव प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश दिले आहेत. अंतरिम ठराव व्यावसायिकांद्वारे आदेश दि. १७ सप्टेंबर, २०२१ रोजी डाऊनलोड केला, म्हणून कॉर्पोरेट दिवाळखोरी ठराव प्रक्रियेशी संबंधित सर्व दिनांक दि. १७.०९.२०२१ पासून विचारात घेण्यात येतील.

ग्रोहेल्दी इंडिया ॲग्रोटेक प्रायव्हेट लिमिटेडच्या धनकोंना याद्वारे त्यांचे दावे पुराव्यासह ३०.०९.२०२१ रोजी किंवा त्यापूर्वी अंतरिम ठराव व्यावसायिक यांच्याकडे नोंद क्र. १० समोर नमूद पत्त्यावर सादर करण्यास सांगण्यात येत आहे.

वित्तीय धनको यांनी दाव्याबाबतचे त्यांचे पुराव्यासहीत दावे फक्त इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करावे. इतर सर्व धनको त्यांचे दाव्याबाबतचे पुरावे व्यक्तिशः, टपालाद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करू शकतात.

नोंद क्र. १२ समोर नमूद केल्यानुसार वर्गाशी संबंधित वित्तीय धनकोने, फॉर्म सीएमधील वर्गाचे अधिकृत प्रतिनिधी म्हणून काम पाहण्याकरिता नोंद क्र. १३ समोर नमूद तीन दिवाळखोरी व्यावसायिकांमधून अधिकृत प्रतिनिधी म्हणून त्यांची पसंती नमूद करावी. (सध्या कोणीही नाही)

दाव्याबाबतचे चुकीचे किंवा दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास दंड ठोठावण्यात येईल.

संजय बद्रिलाल पुंगलिया
ग्रोहेल्दी इंडिया ॲग्रोटेक प्रायव्हेट लिमिटेडच्या
प्रकरणामध्ये अंतरिम ठराव व्यावसायिक
नोंदणीकरण क्र. IBBI/IPA-001/IP-P00855/2017-18/11437

दिनांकः १८.०९.२०२१
ठिकाणः अहमदाबाद